# भाषा हे ओळख निर्माण करण्याचे माध्यम : डॉ. शंकर विभुते



देगलूर (वार्ताहर) - भाषा हे व्यक्तिमत्त्वाचे अभिन्न अंग आहे. भाषेमुळे माणसाचे व्यक्तिमत्त्व जगासमोर येते. म्हणून युवकांनी भाषेकडे गांभीर्याने पाहावे. भाषा हे स्वत:ची ओळख निर्माण करण्याचे साधन आहे. मराठी भाषेबरोबरच इतर भाषेतील ज्ञानही विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे, असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. शंकर विभुते यांनी केले. ते देगलूर महाविद्यालयातील मराठी विभागाकडून आयोजित केलेल्या, मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. त्यांनी अनेक उदाहरणे देऊन भाषेचे महत्त्व अधोरेखित केले. शेवटी सादर केलेल्या मा. आमदार गणपतराव या ग्रामीण विनोदी कथेला विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय पाटील हे उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. अशोक टिपरसे यांची उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. सर्जेराव रणखांब यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकातून मराठी विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. मराठी विभागप्रमुख डॉ. विठ्ठल जंबाले यांनी तीन दिवसीय व्याख्यानमालेचा थोडक्यात आढावा घेतला आणि मान्यवरांचे स्वागत केले. प्रमुख वक्ते डॉ. शंकर विभुते यांचा परिचय डॉ. राजेश्वर दुडूकनाळे यांनी करून दिला. अध्यक्षीय समारोपात डॉ. संजय पाटील यांनी मराठी भाषा संवर्धनाच्या जबाबदारीचे भान युवकांना आले पाहिजे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणपत मैलारे यांनी केले, तर आभार प्रा. सीताराम हाके मानले. कार्यक्रमाला डॉ. माधव चोले, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.